रविवार, १२ सप्टेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ५६
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

गणेशोत्सवावर वाढत्या कोरोनाचे सावट/३
अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थ प्रहर/४
वाहतूक कोंडीने नेरळवासी त्रस्त/५

## घोटाळाप्रकरणी विवेक पाटील २८ सप्टेंबरपर्यंत कोठडीतच



**पनवेल :** कर्नाळा बँकेच्या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळाप्रकरणी बँकेचे अध्यक्ष आणि शेतकरी कामगार पक्षाचे नेते, माजी आमदार विवेकानंद शंकर पाटील यांचा तळोजा जेलमधील मुक्काम सत्र न्यायालयाने २८ सप्टेंबरपर्यंत वाढवला आहे. त्यांना अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) १५ जून रोजी पनवेल येथील घरातून अटक केली होती. विवेक पाटील यांना तळोजा जेलमधून रिलायन्स फाऊंडेशनच्या हॉस्पिटलमध्ये ईडीच्या बंदोबस्तात तपासणीसाठी नेण्यास न्यायालयाने परवानगी दिली होती. त्यानुसार त्यांची रुग्णालयात तपासणी करून आणल्याचे व त्याचा अहवाल न्यायालयात सादर केल्याचे समजते. विवेक पाटील यांच्या न्यायालयीन कोठडीची मुदत गुरुवारी (दि. ९) संपत होती. त्यांना तळोजा जेलमधून व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे ईडी न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते.

# मुंबईतील निर्भयाचा अखेर मृत्यू

## ■ देशभरातून संतप्त प्रतिक्रिया; आरोपीला फाशी देण्याची मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील साकीनाका परिसरात झालेल्या बलात्कार पीडित महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे खळबळ माजली होती. जखमी अवस्थेत महिलेला उपचारासाठी घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र मृत्यूशी तिची झुंज अपयशी ठरली आहे. या घटनेवरून संपूर्ण देशभरातून संताप व्यक्त होत असून पुन्हा एकदा महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला

### महिलांवरील वाढते अत्याचार रोखण्यात ठाकरे सरकार अपयशी




आहे. आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी आता सर्व स्तरांतून होत आहे.

घरोघरी गणेशोत्सव साजरा होत असताना शुक्रवारी मुंबईतील एक धक्कादायक घटना समोर आली होती. महिलेवर बलात्कार करण्यात आल्यानंतर आरोपीने गुप्तांगात रॉड घुसवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. साकीनाका येथील खैरानी रोड परिसरात ही घटना घडली होती. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली होती. पोलिसांनी याप्रकरणी आरोपी मोहन चौहानला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास कंट्रोल रूमला साकीनाका येथे खैराना रोडवर एक महिला रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध अवस्थेत पडली असल्याचा फोन आला होता. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त आणि अतिरिक्त पोलीस आयुक्तांनी घटनास्थळी धाव घेतली होती. घटनास्थळी पोहोचल्यानंतर पोलिसांनी महिलेला घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात दाखल केले होते. महिलेवर उपचार सुरू होते, मात्र तिची स्थिती खूप गंभीर होती. उपचार सुरू असतानाच शनिवारी पीडितेचा मृत्यू झाला.

### माणुसकीला काळिमा फासणारा प्रकार; नराधमांना फाशीची शिक्षा द्या -फडणवीस




विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस म्हणाले की, साकीनाक्यात घडलेला हा प्रकार मन सुन्न करणारा आहे. ज्याप्रकारे गेल्या महिन्याभरात बलात्काराच्या घटना घडत आहेत, त्यामध्ये लक्ष घालण्याची गरज आहे. राज्यात विविध ठिकाणी अशा घडत आहेत. अतिशय भयंकर अशा या घटना आहेत. मुंबईसारख्या सुरक्षित शहरात असे घडल्याने लौकिकाला धक्का पोहचतो. हा प्रकार तर माणुसकीला काळिमा फासणारा आहे. आमची मागणी आहे की, या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करा, फास्टट्रॅक कोर्टात हे प्रकरण न्यावे आणि नराधमांना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी फडणवीस यांनी केली आहे.

❝ राज्य सरकारने जबाबदारी स्वीकारायला पाहिजे, मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांनी चर्चा करून कारवाई करावी. राज्यात एकामागोमाग एक घटना होत आहेत. आम्ही काही बोललो की बोलायचे आम्ही राजकारण करतो. शक्ती कायदा आणणार होते त्याचे काय झाले?

**-प्रवीण दरेकर,**
विरोधी पक्षनेते, विधान परिषद

### भाषणे करण्यापेक्षा कायद्याची अंमलबजावणी करा -चित्रा वाघ



माफ कर ताई आम्हाला. कुठल्या वेदनेतून तू गेली असशील याची कल्पनाही करवत नाही. तिला काय वेदना झाल्या असतील, पण या मुर्दाड सरकारला याचे देणेघेणे नाही. राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. महिलांची बोटे छाटली जातात, पण कुठे एफआयआरही नोंदवली जात नाही. गणरायाने या सरकारला सद्बुद्धी द्यावी. महिला अत्याचारावर फक्त भाषणे करण्याऐवजी त्यावरील कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, असे भाजप नेत्या चित्रा वाघ आक्रमक होत म्हणाल्या.

### अमरावतीत बलात्कार पीडितेची आत्महत्या

**अमरावती :** अमरावतीमध्ये अल्पवयीन गर्भवती बलात्कार पीडितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने महाराष्ट्र पुन्हा एकदा हादरला आहे. येवदा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावात ही घटना घडली आहे. बलात्कारानंतर पीडिता सात महिन्यांची गर्भवती राहिली होती. याप्रकरणी एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे. पीडितेवर गेल्या नऊ महिन्यांपासून अत्याचार सुरू असल्याचे समजते.

### पुण्यात शिक्षिकेवर बलात्कार

**पुणे :** पिंपरीतील एका व्यक्तीने रिटायर एसीपी असल्याचे सांगत शिक्षिकेवर बलात्कार केला. आरोपीने पीडित शिक्षिकेचे अश्लील फोटोदेखील काढले. पिंपळे गुरव येथे डिसेंबर २०१९ ते ८ ऑगस्ट २०२१ या कालावधीत ही घटना घडली. पीडितेने याप्रकरणी शुक्रवारी (दि. १०) सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार आरोपी विकास अवस्ती यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तू सुखकर्ता... तू दुःखहर्ता...!



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी दरवर्षीप्रमाणे बाप्पाचे मोठ्या जल्लोषात आणि भक्तिभावात आगमन झाले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह कुटुंबीयांच्या उपस्थितीत गणरायाची आरती करण्यात आली. (अधिक छायाचित्रे पान ६ वर..)

### आरती संग्रहाचे प्रकाशन



पनवेल : महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गणेशोत्सवानिमित्त प्रसिद्ध केलेल्या आरती संग्रहाचे प्रकाशन भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक अनिल भगत, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष मयूरेश नेतकर, सचिव चिन्मय समेळ, शहराध्यक्ष रोहित जगताप आदी उपस्थित होते.

## निवडक

### गुजरातचे मुख्यमंत्री विजय रूपानी यांचा राजीनामा



**सुरत :** गुजरातचे मुख्यमंत्री विजय रूपानी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी शनिवारी (दि. ११) राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे आपला राजीनामा सोपवला. राजीनामा दिल्यानंतर रूपानी यांनी पंतप्रधान मोदींचे आभार मानले. जेपी नड्डा यांचे मार्गदर्शन माझ्यासाठी अभूतपूर्व आहे. आता मला जी काही जबाबदारी मिळेल ती मी पार पाडीन, असे रूपानी यांनी म्हटले आहे.

### मथुरेत दारू, मांस विक्रीवर बंदी!

**मथुरा :** मथुरेबाबत योगी सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सरकारने मथुरेतील श्रीकृष्ण मंदिराजवळील १० चौरस किमी क्षेत्र तीर्थस्थळ म्हणून घोषित केले आहे. या भागात दारू आणि मांस विक्री करण्यास मनाई असणार आहे. तीर्थक्षेत्राच्या अंतर्गत २२ वॉर्ड येतात. या भागात येणाऱ्या भाविकांच्या आस्थेचा विचार करून घेतलेल्या योगी सरकारच्या या निर्णयानंतर साधूसंतांनी आनंद व्यक्त केला.

# महाआघाडीत जुंपली

### भुजबळ आणि शिवसेना आमदारामध्ये खडाजंगी



**नाशिक : प्रतिनिधी**

अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ आणि शिवसेनेचे आमदार सुहास कांदे यांच्यात मोठी शाब्दिक चकमक झाल्याचे समोर आले आहे. आपत्कालीन निधी आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याच्या मुद्द्यावरून पालकमंत्री छगन भुजबळ आणि शिवसेनेचे आमदार सुहास कांदे यांच्यात जोरदार खडाजंगी झाल्याचे पाहायला मिळाले. या वेळी सुहास कांदे यांच्या समर्थकांनी जोरदार घोषणाबाजीदेखील केली. नाशिकमधील नांदगावमध्ये हा प्रकार घडला आहे.

पालकमंत्री छगन भुजबळ हे नुकसान पाहणी दौऱ्यावर होते. नुकसानीचा आढावा घेतल्यानंतर त्यांची लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांसोबत बैठक होती. या बैठकीला शिवसेना आमदार सुहास कांदे हेसुद्धा उपस्थित होते. या दोघांमध्ये नुकसानीच्या तातडीच्या मदतीवरून शाब्दिक चकमक सुरू झाली. शब्दाने शब्द वाढत गेला आणि दोघेही मोठमोठ्या आवाजात भांडू लागले.

सुहास कांदे यांनी सांगली-कोल्हापूरच्या महापुरावेळी जशी मदत दिली होती, तशीच तत्काळ मदत मिळावी, अशी मागणी केली. त्या वेळी छगन भुजबळ यांनीही त्यांना मदतीचे आश्वासन दिले, मात्र तातडीच्या मदतीवरून दोघांमध्ये सुरू झालेली बाचाबाची, बाहेर पडेपर्यंत थांबलीच नाही. सुहास कांदे यांच्या समर्थकांनी त्याच वेळी घोषणाबाजीही केली.

# कोकणासह राज्यात अतिवृष्टीचा इशारा

**मुंबई :** बंगालच्या खाडीमध्ये कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. यामुळे कोकण पट्ट्यात, गोवा, मध्य महाराष्ट्रात, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, विदर्भ ओडिशा आदी भागात पुढील पाच दिवस तीव्र ते अतितीव्र स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे.

मध्य महाराष्ट्राला १३ सप्टेंबर आणि कोकण, गोव्यामध्ये १३-१४ सप्टेंबरला अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरावर सायक्लॉन सदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. हे वादळ उत्तर-पश्चिमेकडे सरकत आहे. यामुळे ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या समुद्रकिनारी पुढील ४८ तासांत हे वारे आदळणार असून ते पुढील तीन दिवसांत ओडिशावरून छत्तीसगढकडे जाईल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

दरम्यान, दिल्लीमध्ये रात्रभरापासून मुसळधार पाऊस कोसळत असून गेल्या दशकभरापासूनचा हा सर्वाधिक पाऊस आहे. यामुळे दिल्लीत ठिकठिकाणी पावसाचे पाणी साचू लागले आहे.

# दीड दिवसाच्या बाप्पांना भावपूर्ण निरोप

## ■ कृत्रिम तलावात विसर्जन करण्यास भक्तांचे प्राधान्य



**अलिबाग : प्रतिनिधी**

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या गणपती बाप्पांचे शुक्रवारी घरोघरी आगमन झाले. आपल्या लाडक्या बाप्पांची भक्तांनी मनोभावे सेवा केली. दरम्यान, दीड दिवसाच्या गणपतींचे शनिवारी (दि. ११) अत्यंत साध्या आणि भावपूर्ण वातावरणात विसर्जन झाले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर व पर्यावरणपूरक सण साजरे करण्याच्या उद्देशाने कृत्रिम तलावांमध्ये बाप्पांचे विसर्जन करण्याकडे भाविकांचा कल दिसून आला.

घरोघरी गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. गणेशाची पूजाअर्चा करण्यात आली. दुपारी टाळमृदंगाच्या नादात आरती झाली. मोदकांचा नैवेद्य दाखवण्यात आला. जगावरील कोरोनाचे संकट दूर कर, असे साकडे सर्वांनीच आपल्या लाडक्या गणरायाला घातले.


गणेशोत्सवानिमित्त चाकरमानी मोठ्या संख्येने गावागावात दाखल झाले आहेत. गेल्या वर्षी कोरोनामुळे अनेकांना गावी येणे शक्य झाले नव्हते. यंदा गावी येणाऱ्या भक्तांची संख्या मोठी आहे, मात्र यंदाही कोरोनाचा प्रभाव गतवर्षीच्या तुलनेत कमी असला, तरी उत्साह कमीच आहे. त्यातच अधूनमधून पडणारा पाऊस निरुत्साहात भर घालत होता. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या गणेशोत्सवातदेखील शांततेचे वातावरण आहे.



# मच्छीमारांनी मानले लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्या बहुचर्चित असलेला न्हावा शिवडी प्रकल्प जो भविष्यात मुंबई अणि नवी मुंबई यांना जोडणारा दुवा ठरणार आहे. ज्यामुळे दळणवळण अधिक सुखकर होणार आहे. या प्रकल्पातील ब्रिजच्या कामामुळे मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. ही बाब माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी एमएमआरडीएसोबत बैठक घेऊन मार्गी लावली. त्यानुसार योग्य तो पाठपुरावा करून मच्छीमारांना नुकसानभरपाई मिळवून दिली. (पान २ वर..)



पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
रविवार, दि. १२ सप्टेंबर २०२१ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
९. आरोग्य उपकेंद्र ६, रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, कामोठे
१०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
११. उपकेंद्र लॉ कॉलेज, तळोजा
१२. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
१३. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
१४. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
१५. श्री. गणेश विद्यामंदिर प्राथमिक शाळा नंबर ६, धाकटा खांदा
१६. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
१७. आगरी शाळा, खांदा कॉलनी
१८. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर
१९. सुधागड कॉलेज, कळंबोली
२०. न्यु इंग्लिश स्कूल, कळंबोली
२१. दत्तुशेठ पाटील हायस्कूल, कामोठे

कोव्हॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल

टीप : प्रत्यक्ष लसीकरणासाठी कुपन्स मर्यादित असल्यामुळे ऑनलाइन नोंदणीस प्राधान्य द्यावे.

पनवेल महानगरपालिकेने परदेशात शिक्षणाकरिता, नोकरीकरिता तसेच ऑलिम्पिक खेळाकरिता जाणाऱ्या नागरिकांसाठी कोविड लसीकरण कोविशिल्डचा दुसरा डोस देण्याकरिता विशेष सत्राचे आयोजन केले आहे. या सत्रामध्ये पहिला डोस घेऊन २८ दिवस पूर्ण झालेल्या परदेशी जाणाऱ्या नागरिकांचे लसीकरण केले जाईल.

कागदपत्रे :- आधार कार्ड, पासपोर्ट, व्हिसा डॉक्युमेंट, परदेशात काम करीत असल्याचे प्रमाणपत्र तसेच खेळाकरिता किंवा शिक्षणाकरिता संबंधित संस्थेचे ऑफर लेटर

# दीड दिवसाच्या गणरायाला भावपूर्ण निरोप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तू सुखकर्ता तू दुःखहर्ता म्हणत गणरायाचे शुक्रवारी वाजत-गाजत घरोघरी आगमन झाले. एका दिवसाची सेवा केल्यानंतर दीड दिवसाच्या गणरायाला शनिवारी (दि. ११) भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या गजरात मोठ्या भक्तिभावाने लाडक्या बाप्पाला निरोप देण्यात आला. याकरिता पनवेल महापलिकेच्या वतीने विविध उपाययोजना केल्या होत्या.

पनवेल शहरातील कोळीवाडा, बल्लाळेश्वर तलाव, तक्का या ठिकाणी गणरायाच्या मूर्ती विर्सजित करण्यात आल्या. या करिता महापालिकेच्या वतीने कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर विविध उपाययोजना करण्यात आल्या होत्या. त्यामुळे गणेशभक्तांना विसर्जनाच्या वेळी कोणत्याही समस्यांना सामोरे जावे लागले नाही.

## पनवेल महापालिकेच्या वतीने चोख व्यवस्था



**पनवेल महापालिका हद्दीत प्रभागनिहाय झालेले विसर्जन**

- खारघर - ११५७
- कळंबोली - १४८१
- कामोठे - ४४८
- पनवेल - ११३८

या संदर्भात पनवेल महापालिकेच्या नगरसेविका रूचिता लोंढे यांनी माहिती दिली.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सोसायटी मित्र मंडळ, भाजप वॉर्ड क्रमांक १९, मिडलक्लास हौसिंग सोसायटी कमिटी पनवेल महापालिका आणि कोशिश फाउंडेशनच्या वतीने घरगुती गणरायाच्या मूर्तींचे विसर्जन करण्याकरिता स्वतंत्र पिंप उपलब्ध करण्यात आले होते. या ठिकाणी दोन फुटी शाडूच्या मातीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले, तसेच विसर्जनाकरिता आलेल्या गणेशभक्तांना कोशिश फाउंडेशनच्या वतीने सभागृह नेते व फाउंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



**उरण : नगराध्यक्षा सायली म्हात्रे यांच्या घरी विराजमान गणेशमूर्ती.**



**बोर्ली-पंचतन : येथील पत्रकार संतोष रेळेकर यांच्या घरी श्रीवर्धन प्रांताधिकारी अमित शेडगे व कुटुंबीय यांनी गणरायाचे दर्शन घेतले.** (छाया : साहिल रेळेकर, श्रीवर्धन)



**उरण : पत्रकार दिनेश पवार यांच्या घरातील विराजमान गणपती बाप्पा.**

# भोर घाटात दरड सत्र सुरूच

## महाड-पुणे प्रवास काही तासांकरिता ठप्प

**महाड : प्रतिनिधी**

जुलै महिन्यात आलेल्या अतिवृष्टीत महाड भोर वरंध या मार्गाचे प्रचंड नुकसान झाले होते. महाड भोर पुणे घाटात दरडी कोसळल्याने हा मार्ग जवळपास महिनाभर बंद होता. काही दिवसांपूर्वीच सुरू झालेला हा मार्ग शनिवारी (दि. ११) पुन्हा आलेल्या दरडीने बंद झाला होता. प्रशासनाने ही दरड तत्काळ हटवून मार्गावरील वाहतूक पुन्हा सुरळीत केली आहे.



महाड वरंध भोर पुणे या मार्गाचे जुलैमधील अतिवृषित नुकसान झाल्याने जवळपास महिनाभर या मार्गावरील वाहतूक ठप्प होती. महाड प्रशासनाकडून वरंध घाट रस्त्यावरील अडथळे दूर केल्यानंतर हा मार्ग वाहतुकीस खुला करण्यात आला होता, मात्र शुक्रवारी रात्री २ वाजता पुणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत पुन्हा दरड कोसळल्याने या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. दरड हटवण्याचे काम तत्काळ हाती घेण्यात आले आणि वाहतूक अनेक तासांनी पुन्हा सुरळीत करण्यात आली. गेले दोन दिवसांपासून विविध भागात पुन्हा मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने दिली आहे. यामुळे आधीच नादुरुस्त झालेल्या महाड भोर पुणे मार्गावर दरडींचा धोका कायम आहे. यामुळे मुसळधार पावसाच्या धोक्याच्या इशाऱ्यानंतर नागरिकांनी या मार्गावरून प्रवास करणे टाळले पाहिजे, असे सांगण्यात आले आहे.

# लोकमान्य सोसायटीतर्फे चित्रकला स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटीतर्फे गणेश चतुर्थी उत्सवानिमित्त लहान मुलांमुलींकरिता लोकमान्य गणरंग चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा लोकमान्य सोसायटीच्या सर्व शाखांमधून घेण्यात येणार आहे.

या स्पर्धेत लहान गट व मोठा गट अशा दोन विभागात घेण्यात येणार असून वय वर्षे ६ ते १० हा छोटा गट व वय वर्षे ११ ते १३ हा मोठा गट असेल. स्पर्धेचा विषय गणेशोत्सवाचे सुंदर चित्र हा असून स्पर्धकांनी आपापली चित्रे ए-४ साईझच्या ड्रॉईंग पेपरवर काढून नजीकच्या लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटीच्या शाखेत जमा करावी. नोंदणी फॉर्ममध्ये पालकांचे नाव, मोबाइल क्रमांक, सहभागीचे नाव, शाळेचे नाव नमूद करावे.

गणेशोत्सव हा समस्त भारतीयाचा जिव्हाळ्याचा आणि आनंदाचा सण आहे व बाळ गोपालापासून सर्वजण ह्यात आनंदाने सहभागी होत असतात.

छोट्या मुलांच्या कलेला वाव देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली असून लोकमान्य सोसायटीच्या १० विभागीय कार्यालयाद्वारे सर्व २१३ शाखांच्या माध्यमातून लहान चित्रकारांना आपली कला सदर करण्याची संधी प्राप्त करून देण्यात आली आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार असून विभागीय स्तरावर विजेत्यांची निवड करण्यात येणार आहे. स्पर्धेतील सर्व सहभागी बालचमूंना प्रशस्ती पत्रक देण्यात येणार आहे. ज्या स्पर्धकांना भाग घ्यायचा असेल त्यांनी आपली चित्रे नावासहित १३ ते १८ सप्टेंबरदरम्यान लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटीच्या नजीकच्या शाखेत जमा करावीत. विजेत्यांची नावे विभागीय कार्यालयातून घोषित करण्यात येतील.

# बिर्ला कार्बन इंडियाकडून शिक्षकांचा गौरव

**चौक : प्रतिनिधी**

विद्या प्रसारिणी सभा चौक संचलित सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, प्राथमिक विद्यामंदिर चौक व विद्यामंदिर सारंग शाळेतील ४८ शिक्षकांचा भेटवस्तू व गुलाब पुष्प देऊन गौरव करण्यात आला. या वेळी बिर्ला कार्बन कंपनीचे युनिट हेड हनुमान गुप्ता उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला जयराम म्हात्रे व कांचन म्हात्रे यांच्या संगीत साथीने विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतपद्य सादर केले. सुवर्णा मोरे, मुकुंद वरुडे यांनी शिक्षकांतर्फे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे सचिव योगेंद्र शहा यांनी बिर्ला कंपनी राबवत असलेल्या विविध उपक्रमांचे स्वागत करून कंपनीचे आभार मानले.

या वेळी कंपनीचे मॅनेजर सचिन कंदळे, सीएसआर प्रमुख लक्ष्मण मोरे, संस्थेच्या संचालिका तथा प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुलभा गायकवाड, शाळेचे मुख्याध्यापक भोमले, उपमुख्याध्यापिका पुजारी, पर्यवेक्षक मोळीक, डी. एस. कांबळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन अनिल बडेकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शरद कुंभार यांनी मानले.

















**पनवेल : भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे यांनी बोर्ले येथील गोविंद पाटील, तुळशीराम पाटील, तसेच बेलवली, वारदोली, चिखले, भिंगारवाडी येथे गणपती दर्शन घेतले. या वेळी योगेश लहाने, मारुती पाटील, सरपंच नामदेव पाटील, नारायण भोपी, राम फडके आदी उपस्थित होते.**







**पनवेल : ओबीसी सेलचे अध्यक्ष एकनाथ देशेकर यांच्या गणपतीचे दर्शन घेताना सरपंच कमला देशेकर, उपसरपंच मंगेश पाटील, मा. सरपंच नामदेव जमदाडे, उपसरपंच दिनेश पाडेकर, रवींद्र पाटील, उमेश वारदे, विश्वनाथ पाटील, मा. सरपंच मंदा देशेकर, कुंडलिक देशेकर आदी उपस्थित होते.**

पान १ वरून

## मच्छीमारांनी मानले लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार

याबद्दल गव्हाण ग्रामस्थांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आभार मानले. या वेळी प्रमोद कोळी, काशिनाथ कोळी, विशाल कोळी, संजीव कोळी, राजकिरण कोळी आदी ग्रामस्थ उपस्थित होते. भविष्यातही आपण अशी बरीच कामे मार्गी लावू आणि यशस्वी करू, असे आश्वासन या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मच्छीमारांना दिले.


पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

पनवेल महापालिका ग्रामीण हद्दीत होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

| रविवार | टेंभोडे रा.जि.प. शाळा Ward B | भोईरपाडा रा.जि.प. शाळा | देवीचा पाडा रा.जि.प. शाळा | खांदा गाव प.म.पा शाळा | तोंडरे वरचा पाडा रा.जि.प. शाळा | पेठाली रा.जि.प. शाळा | भिंगारी रा.जि.प. शाळा Ward D | कांदेवाडी Ward D | नागझरी रा.जि.प. शाळा Ward A |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

निर्देशित केलेल्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या डोसकरिता २०० व दुसऱ्या डोसकरिता १०० डोस उपलब्ध असतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी. (वेळ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत) ※ टिप : ग्रामीण भागातील लसीकरण शुक्रवारच्या नियोजनाप्रमाणेच आज होईल.

## निवडक



### कुंडेवहाळमध्ये भेकराला जीवदान

**उरण** : कुंडेवहाळ परिसरात दगडखान परिसरातील कामगारांच्या मुलांना भेदरलेल्या अवस्थेत सापडून आला. ही बाब प्राणी केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे सल्लागार अमोल आंबोलकर या सर्प मित्राला समजताच त्यांनी लागलीच वन्यजीवप्रेमी रायगडभूषण राजू मुंबईकर यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यांनी क्षणांचाही विलंब न करता भेदरलेल्या अवस्थेतील भेकराला त्या मुलांकडून आपल्या स्वाधीन घेतले, तसेच याची माहिती वनविभागातील अधिकाऱ्यांना कळवली व त्या भेकराला जंगलात सोडून दिले. या वेळी राजू मुंबईकर यांच्यासोबत उरण वनपरिक्षेत्र वनविभागातील वन अधिकारी हरिदास करांडे, राजेंद्र पवार, एस. बी. इंगोले आदी अधिकारी वर्ग उपस्थित होता.

### कोन गावाजवळील बारवर कारवाई

**पनवेल :** कोन परिसरात असलेल्या साई निधी-टोपाज लेडिज बारवर तालुका पोलिसांनी कारवाई करीत महिला वेटर, मॅनेजर व ग्राहकांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. हा बार विहित वेळेत बंद करून ग्राहकांसाठी गुप्त पद्धतीने पुन्हा चालू करून शासनाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन केले. बारमधील महिला वेटर या पुरुष ग्राहकांसोबत अश्लील व बिभत्स मिळून आल्या. म्हणून एकूण ३२ जणांविरुद्ध ही कारवाई करण्यात आली. ही कारवाई अ.मा.वा. प्रति. कक्ष गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पराग सोनावणे, रवींद्र दौंडकर, सहाय्यक निरीक्षक प्रशांत शिर्के, पोलीस उपनिरीक्षक उमेश भुटाळ व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

### रेल्वे पटरीच्या बाजूला आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेलजवळील कोळखे गावच्या पाठीमागे रेल्वे पटरीच्या बाजूला पोल १७/५ पासून ५० मी अंतरावर एका व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे असून डोक्यावर केस नाहीत. अंगात पिवळा टी-शर्ट व करड्या रंगाची हाफ पॅन्ट घातली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा उपनिरीक्षक लाला लोंडकर यांच्याशी संपर्क साधावा.



### स्वराज, विरेनला पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा

**पनवेल :** स्वराज सोनावणे बॅरिस्टर पदवीसाठी लंडनला जात आहे. शेतकरी, सर्वसामान्य कुटुंबातून उच्च शिक्षणासाठी लंडनला जाणाऱ्या स्वराज सोनावणेची झेप प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार शुभेच्छापर आयोजित कार्यक्रमास उपस्थित विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी काढले. या वेळी विरेन ठाणगे यालादेखील परदेशात (फायनान्स मास्टर डिग्री) उच्च शिक्षणासाठी जातेसमयी शुभेच्छा दिल्या. या वेळी लोकशक्ती संजीवनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व ज्येष्ठ समाजसेवक, उद्योजक डॉ. संजय सोनावणे, पत्रकार विवेक पाटील, मंदार दोंदे, निलेश सोनावणे, भारतकुमार कांबळे, राजेंद्र पाटील, धम्मशील सावंत, राजूशेठ बोहरा, प्रदीप सोनावणे, प्रथमेश सोनावणे, शरद सोनावणे, रूपम सोनावणे, नितीन जोशी, अनिल भातणकर, अशोक काळे, अमेय काळे, रवींद्र भोईर, उत्तम शेळके, ॲड. अमोल शेळके आदी लोकशक्ती संजीवनी प्रतिष्ठान महाराष्ट्रचे पदाधिकारी, पनवेल तालुका पत्रकार विकास मंचचे पदाधिकारी, रूद्रवली बौद्धजन विकास संस्थेचे पदाधिकारी एसआरएस ग्रुपचे संचालक व स्टाफ आदी उपस्थित होते.

# गणेशोत्सवावर कोरोनाचे सावट

## ▪ दहा दिवसांचे गणपती आले दीड दिवसांवर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोरोनाच्या महामारीने एकट्या नवी मुंबईत दोन हजार जणांचा बळी घेतल्याने या उत्सवावर आज दुःखाचे सावट पसरले आहे. याचा सर्वाधिक फटका हा येथील घरगुती गणेशोत्सवाला बसला आहे. साहजिक येथील शहरी भागाबरोबरच विशेषतः गावठाणातील पाच, १०, १४ व २१ दिवसांचे गणपती आज दीड दिवसांवर आले आहेत. कोणत्या ना कोणत्या घरात माणूस दगवल्याने गणेशोत्सवावर आज दुःखाची छाया पसरली आहे.



कोरोना हे जरी यास एक कारण असले तरीही रोजच बदलत जाणारे शासनाचे धोरणही यास तितकेच जबाबदार असल्याचे येथील भाविकांचे मत आहे. शासनाचा उत्सवाकडे पाहण्याचा दृष्टिकोन असाच नकारात्मक राहिल्यास एक दिवस सणवार कायमचेच बंद होतील, अशी भीतीही येथील भाविक व्यक्त करतात. केवळ सणवारांमुळे, देवाच्या दर्शनामुळेच कोरोनाचा प्रादूर्भाव वाढतो का? असा रोखठोक सवाल शिवछाया मित्र मंडळ या नवी मुंबईतील पहिल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अंकुश वैती यांनी केला आहे.

शासनाने गणेशोत्सव काळात भाविकांना दर्शन बंदीचा फतवा काढल्याने आज सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांत फार मोठी नाराजी व्यक्त होत आहे. आज गणेशोत्सव दीड दिवसांवर आल्याने साहजिकच गणेश मूर्तींचे आकार कमी झाले आहेत. आरास, सजावट कमी झाली आहे. मंडप, स्पीकर, डेकोरेशन, बँड, करमणुकीचे कार्यक्रम सादर करणारे भजन कलावंत, लोककलावंत, तबले-पखवाज, हार्मोनियम, टाळ बनविणारे कारागीर, फुलांचे उत्पादन घेणारे शेतकरी या सर्वांच्याच उदरनिर्वाहावर गदा आली, असे मत भजनी कलावंत अमृत पाटील यांनी व्यक्त केले.

कोरोना संकटामुळे बाजाराला फार मोठा मंदीचा सामना करावा लागत आहे. साहजिकच या व्यवसायांवर अवलंबून असलेल्या ग्राम कारागिरांवर, व्यापाऱ्यांवर आज उपासमारीची वेळ आली असून जो तो रिकाम्या हातांना काम मिळावे म्हणून झगडतो आहे. म्हणूनच मायबाप शासन या दुसऱ्या दुखऱ्या बाजूचा तरी विचार करील का? असा भावनिक सवाल येथे व्यक्त होत आहे.

## पनवेलमध्ये महिलांची सुखरूप सुटका

### नगरसेवक राजू सोनी यांची सतर्कता

**पनवेल : वार्ताहर**

शहरातील टपाल नाका येथील बोहरा यांच्या घराचा लाकडी जिना कोसळला. त्यामुळे त्या घरातील ८५ वर्षांच्या आजीबाई आणि २० ते २२ वर्षांच्या मुलीला बाहेर निघता येत नव्हते. याची माहिती नगरसेवक राजू सोनी यांना मिळताच त्यांनी तत्परतेने पनवेल महानगरपालिका व अग्निशमन दलाला पाचारण केले. त्यानुसार दोघींना सुखरूप खाली उतरविण्यात आले.

नगरसेवक राजू सोनी यांना यासंदर्भात माहिती मिळताच पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त सचिन पवार व धैर्यशील जाधव यांना फोन केला व याची माहिती दिली, तसेच पनवेल महापालिकेच्या अग्निशामक दलाला घटनास्थळी बोलवले व अग्निशामक दलाने पहिल्या मजल्यावरील त्यांच्या घराच्या खिडकीला शिडी लावली आणि ८५ वर्षांची आजी व २० ते २२ वर्षाच्या मुलीला खाली सुखरूपपणे आणले. राजू सोनी आणि अग्निशामक दल यांच्यामुळे या दोघींना सुरक्षितपणे खाली उतरवण्यात यश आले.

या वेळी आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, अग्निशामक दलाचे अनिल जाधव उपस्थित होते. राजू सोनी यांनी तत्परतेने दोन महिलांना सुखरूप बाहेर काढण्यात आल्याबद्दल परिसरातील व्यापारी बांधवांनी त्यांचे अभिनंदन व आभार मानले आहेत.



## फसवणुकीच्या गुन्ह्यातील टोळीचा म्होरक्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

वेगवेगळ्या प्रकारे लोकांची फसवणूक करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा म्होरक्याला तळोजा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

आरोपी सहाबुद्दीन मोईनुद्दीन खान (रा. मुंब्रा) हा मार्केट रेटपेक्षा कमी भावाने लोखंडी रॉड, लोखंडी कॉईल, बॅटरी असा माल देतो असे सांगून एखाद्या कंपनीत माल घेणारे पार्टीला घेऊन जाऊन लोखंडी रॉड, लोखंडी कॉईल, बॅटरी दाखवायचा. त्यानंतर त्या पार्टीला स्वतःच्या नावाचे कंपनीचे बँक करन्ट अकाऊंट नंबर देऊन त्यात मालाचे पैसे टाकण्यास सांगायचा. त्यानंतर डिल निश्चित ठरल्यानंतर माल ट्रकमध्ये भरल्यानंतर पार्टीकडून बँक खात्यात पैसे घेऊन पार्टीला माल न देता लागलीच बँक खात्यातून पैसे काढून बँक खाते व मोबाइल नंबर बंद करून पसार होत असे.

अशा प्रकारे त्याने तळोजा पोलीस ठाण्यासह ढोलका पोलीस ठाणे, मोहाडीनगर पोलीस ठाणे, पंजाबी बाग पोलीस ठाणे, कळंबोली पोलीस ठाणे, खालापुर पोलीस ठाणे गुन्हे दाखल होते. याबाबत पोलिसांनी अधिक तपाय करून आरोपीला अटक केली आहे.



## कलावंतांना मानधन देण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

मागील दोन वर्षांपासून कोविड १९ या महामारीमुळे भजन, कीर्तन, प्रवचन या माध्यमातून होणाऱ्या समाजप्रबोधनाचे साप्ताहिक कार्यक्रम बंद आहेत. त्यामुळे कलावंतांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे वारकरी साहित्य परिषद, पनवेल तालुका, रायगड यांच्यातर्फे कलावंतांना मानधन मिळण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात तसीलदार विजय तळेकर यांना निवेदन देण्यात आले.

मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या योजनेंतर्गत सांप्रदायिक, कीर्तनकार व सहकारी मंडळी यांना मदत मिळणे जरुरीचे आहे, मात्र कीर्तनकार व सहकारी मंडळी त्यांच्या नावाची प्रसिद्धी नसल्यामुळे वारकरी साहित्य परिषद, महाराष्ट्र या संघटनेचे स्थानिक पदाधिकारी म्हणून पनवेल तहसीलदार विजय तळेकर यांना कलावंतांना मानधन मिळणेबाबत निवेदन देण्यात आले. पनवेल तालुक्यातील कीर्तनकार, टाळकरी, विणेकरी, गायक, वादक इत्यादी कलावंत मंडळींच्या नावांची यादी निवेदनासोबत जोडण्यात आली आहे.



## मोठी जुईत सुयोग्य आहार प्रदर्शन

**उरण : वार्ताहर**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील मोठी जुई येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने अनुभवातून शोधू या विज्ञानाचे झरे आंतर्गत सुयोग्य आहार प्रदर्शन भरवले होते.

या प्रदर्शनामध्ये घरी बनवलेले वेगवेगळे पदार्थ एकत्र करून त्या सर्व पदार्थांची केळीच्या पानांवर फुलांच्या रांगोळीत सुरेख अशी मांडणी केली होती. हे प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी शाळेचे शिक्षक संजय होळकर, दर्शन पाटील, संदीप गावंड, शर्मिला भोईर, यतीन म्हात्रे व ज्योती बामणकर यांनी विशेष मेहनत घेतली, तसेच या प्रदर्शनात मोठी जुईच्या सरपंच आशा भोईर, उरण पंचायत समितीतील साधन व्यक्ती विभाग प्रमुख वैशाली गावंड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोहर पाटील, सदस्य, सदस्या, अंगणवाडी सेविका व त्यांच्या सर्व सहकारी, पालक प्रतिनिधी, महिला बचत गट प्रतिनिधी, मुख्याध्यापक सुभाष म्हात्रे, सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे प्रमुख संजय होळकर यांनी आभार मानून प्रदर्शनाची सांगता करण्यात आली.

## बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे शिक्षक दिन

**पनवेल : वार्ताहर**

बँक ऑफ महाराष्ट्र, नवी मुंबई झोनच्या अंतर्गत येणाऱ्या नवीन पनवेल शाखेने आपल्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करून शिक्षक दिन साजरा केला.

या वेळी महात्मा फुले महाविद्यालय, पनवेलचे अर्थशात्र विभाग प्रमुख प्रो. डॉ. नरेश मढवी, स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सुभाष भोपी, बँकेच्या नवीन पनवेल शाखेच्या शाखा प्रबंधक पुष्पा खत्री, उपप्रबंधक शुभांगी शुक्ला व विशेष सहाय्यक अरविंद मोरे उपस्थित होते.



सुभाष भोपी म्हणाले की, बँक ऑफ महाराष्ट्र नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असते ही खरोखर अभिमानास्पद बाब आहे. जेव्हापासून शिक्षक वर्ग बँकेशी जोडला आहे तेव्हापासून बँकेच्या सेवेबद्दल सर्व शिक्षक समाधानी आहेत. बँक शिक्षकांच्या आर्थिक गरजा तत्परतेने पूर्ण करते हीसुद्धा जमेची बाब आहे. प्रो. डॉ. नरेश मढवी म्हणाले की, बँकेने जो शिक्षकांचा सत्कार केला ही खरोखरच शिक्षकांना स्फुरण व अधिक चांगले कार्य करण्यासाठी उद्युक्त करणारी बाब आहे.

पुष्पा खत्री म्हणाल्या की, बँकेला त्यांच्या शिक्षक ग्राहकांचा सत्कार करताना त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करताना अभिमान वाटत आहे, कारण की शिक्षक हा असा वर्ग आहे की, तो जीवनभर विद्यार्थी, समाज व एक चांगला देश घडविण्यासाठी काम करतो.

उपस्थित शिक्षक डॉ. प्रो. नरेश मढवी, सुभाष भोपी, संदीप जुईकर, संजय सावळे, सज्जाद पठाण, सारिका रघुवंशी, रजनी इंगळे, स्वाती खराडे, मीना फुलपगारे, प्रतिभा कुडेकर, गोपीनाथ थळी यांचा सत्कार केला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अरविंद मोरे यांनी, तर कार्यक्रमासाठी सीमा मराठे, राजू म्हात्रे, रेखा जाधव यांनी परिश्रम घेतले.









भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी ठिकठिकाणी जाऊन बाप्पाचे दर्शन घेतले. या वेळी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, नगरसेवक तेजस कांडपिळे आदी उपस्थित होते.



पिरकोन (ता. उरण) : भाजप कार्यकर्ते कमलाकर गोपीनाथ गावंड व दीपक मोरेश्वर गावंड यांच्या घरातील विराजमान गणपतीचे भाजप तालुका ओबीसी सेलचे सचिव प्राचार्य प्रमोद म्हात्रे, पदाधिकारी रवी म्हात्रे, उपाध्यक्ष मुकुंद गावंड, कार्यकर्ते प्रकाश पाटील यांनी दर्शन घेतले.



रमेश दामोदर वत्सराज, देवुळवाडी, उरण



कळंबोली : येथील सेक्टर १६मध्ये केटली अमृततुल्य तरंग या चहाच्या दुकानाचे उद्घाटन गुरुवारी नगरसेविका प्रमिला पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी दुकानाचे मालिक निर्मला बबन कीठे, भाजप शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, केशव यादव, विलास कीठे, प्रकाश फडतरे, मच्छिंद्र कुरुंद आदी उपस्थित होते.




रूपेश पाटील, उरण पूर्व विभाग सरचिटणीस, भाजप



राजेंद्र पांडुरंग पाटील, नवीन पनवेल

# शिक्षणाच्या निर्यातीचा ब्रिटन, अमेरिकेला धनलाभ!



**ब्रिटनमध्ये उच्च शिक्षणासाठी जाणारे भारतीय विद्यार्थी असो की संख्या तसेच उत्पन्नाने वजनदार झालेला अमेरिकेतील भारतीय समूह असो, यामागे काम करणारे अर्थकारण अचंबित करणारे आहे. त्या संबंधीच्या ताज्या आकडेवारीने हा बदल किती वेगवान आणि व्यापक आहे हे लक्षात येते.**



अर्थ प्रहर



यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

शिक्षणाचा व्यवसाय झाला, असे आपण म्हणतो तेव्हा बहुतांश वेळा धंदा शब्द वापरला जातो आणि शिक्षणाची स्थिती किती वाईट किंवा धंदेवाईक झाली आहे, असे आपल्याला म्हणायचे असते. त्या अर्थाने शिक्षणाचा धंदा होणे हे वाईटच, पण तो व्यवसाय कसा जगभर मान्य केला गेला आहे याची अनेक उदाहरणे पाहायला मिळतात. अलीकडेच प्रसिद्ध झालेली या संदर्भातील माहिती अचंबित करणारी आहे. ही माहिती आहे ब्रिटन आणि अमेरिकेतील पण ती आहे भारतीय विद्यार्थी आणि अनिवासी भारतीयांच्या संबंधी. अर्थकारणाला किती महत्त्व आहे, हे या दोन्ही घटनांवरून लक्षात येते.

## भारतीयांचे उत्पन्न दुप्पट!

दुसरे उदाहरण आहे अमेरिकेतील भारतीयांचे आणि त्यांच्या वाढत्या संख्येचे तसेच समृद्धीचे. अमेरिकेतील भारतीय समूह हा उच्चशिक्षित आणि श्रीमंत मानला जातो हे आपल्याला माहित असते, पण त्यासंदर्भातील नेमकी आकडेवारी नसते. अमेरिकेच्या प्रशासनाने अलीकडेच जाहीर केलेल्या सेन्सस डेटाच्या निमित्ताने ती समोर आली असून ती अशीच अचंबित करणारी आहे. भारतीय समूहाचे अमेरिकेच्या दृष्टीने किती महत्त्व आहे हेच या आकडेवारीने स्पष्ट झाले आहे. भारतीय समूह उच्च शिक्षणात तर आघाडीवर आहेच, पण तो वार्षिक उत्पन्नाच्या बाबतीतही अमेरिकन नागरिकांना ओलांडून कितीतरी पुढे निघून गेला आहे. अमेरिकन कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न ६३ हजार ९२२ डॉलर म्हणजे सुमारे ४६ लाख रुपये आहे. तर तेथील भारतीय कुटुंबात ते सरासरी ९० लाख रुपये आहे. म्हणजे अमेरिकन कुटुंबाच्या दुप्पट! तैवान आणि फिलिपिनी समूहही श्रीमंत मानले जात असले तरी भारतीय समूहाच्या ते बरेच मागे आहेत. सर्व बाबतीत भारताच्या पुढे असलेला चीन आणि जपान, पण त्याही देशांच्या समूहांना भारतीय समूहाने मागे टाकले आहे. चीनी कुटुंबात ते ८५ हजार डॉलर तर जपान कुटुंबात ते ८४ हजार डॉलर इतके आहे. अर्थात, अमेरिकेतील सर्व भारतीय इतके श्रीमंत आहेत, असे मानण्याचे कारण नाही. सरासरी ४० हजार डॉलर उत्पन्न असलेली भारतीय कुटुंबेही आहेतच, पण हे प्रमाण फक्त १४ टक्के आहे. तर मूळ अमेरिकन कुटुंबांमध्ये हे प्रमाण ३३ टक्के इतके अधिक आहे. दुसरीकडे दोन लाख डॉलरपेक्षा अधिक (दीड कोटी रुपये) उत्पन्न असणाऱ्या भारतीय कुटुंबांचे प्रमाण २५ टक्के असून इतके श्रीमंत असणारे मूळ अमेरिकन फक्त आठ टक्के आहेत.

## अर्थकारणाचा परिणाम

अमेरिकेत भारतीय समूहाचे महत्त्व वाढत चालले, हे त्यांचे उत्पन्न म्हणून जसे महत्त्वाचे आहे तसेच त्यांची संख्या म्हणूनही महत्त्वाचे आहे. सध्या सुमारे ४० लाख भारतीय अमेरिकेत आहेत. त्यातील १६ लाख हे व्हिसा होल्डर आहेत. १४ लाख हे अमेरिकन नागरिक झाले आहेत. तर मूळ भारतीय वंशांचे असलेले पण अमेरिकेत जन्म झाला, अशा १० लाख नागरिकांचा त्यात समावेश आहे. माहिती तंत्रज्ञान, आर्थिक व्यवस्थापन आणि वैद्यकीय क्षेत्रातील उच्च पदांवर काम करणाऱ्यांमध्येही भारतीय समूहाचा वरचष्मा आहे. अमेरिकेत भारतीय डॉक्टरांचे प्रमाण नऊ टक्के आहे. अमेरिकेच्या राजकारणात भारतीय वंशाचे नागरिक का दिसू लागले आहेत आणि अमेरिका आणि भारताच्या आर्थिक व्यवहारांमध्ये वाढ का होऊ लागली आहे याचे हे एक कारण आहे. हे दोन्ही देश आंतरराष्ट्रीय राजकारणात एकमेकांना सांभाळून घेताना दिसतात, याचेही हे एक कारण म्हणता येईल. अमेरिकेनेही शिक्षणाची निर्यात करूनच असे भारतीय मिळविले आहेत हेही लक्षात घेतले पाहिजे. उद्याच्या जगाची एक झलकही या सेन्ससमध्ये पाहायला मिळते. उदा. अमेरिकेत वास्तव्य करणाऱ्या आशियायी नागरिकांची संख्या १९९०मध्ये केवळ ६६ लाख एवढी होती. ती सध्या दोन कोटी ३० लाखांवर पोहचली आहे आणि २०६०मध्ये ती दुप्पट म्हणजे चार कोटी ६० लाख होईल, असा अंदाज या सेन्ससमध्ये करण्यात आला आहे. त्यातही भारतीय नागरिक अधिक असतील, असे सध्याच्या प्रवाहावरून दिसते, पण महत्वाची बाब ही की अर्थकारणाचा समाजजीवनावर किती परिणाम होतो हे यावरून लक्षात येते. ब्रिटनमधील भारतीय विद्यार्थ्यांमुळे त्या देशाच्या अर्थव्यवस्थेला मिळत असलेले बळ असो की अमेरिकेच्या उभारणीत मोलाचा वाटा उचलत असलेला भारतीय समूह असो, त्याच्या मागील अर्थकारणाचा विचार विसरता येत नाही हेच खरे!

## शिक्षणसंस्थांची मागणी काय?

पहिला संदर्भ आहे तो ब्रिटनमधील. तेथील अर्थकारणाला कोरोना आणि ब्रेक्झीटचा फटका बसला असून त्यातून सावरण्यासाठी तेथील प्रसिद्ध शिक्षणसंस्थांकडून ती मागणी पुढे येते आहे, ती फारच बोलकी आहे. ब्रिटनमध्ये शिक्षण घेण्यासाठी ग्रॅज्युवेट रूट व्हीसा दिला जातो. ब्रिटनमध्ये शिक्षण घेता यावे यासाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे, मात्र ब्रिटनमध्ये अधिक परकीय नागरिकांनी येऊ नये, म्हणून अलीकडच्या काही वर्षांत तेथील व्हीसा धोरण अधिक कडक करण्यात आले आहे. त्यामुळे आणि कोरोना संकटामुळे अशा विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी झाल्याने तेथील शिक्षण संस्था आर्थिक अडचणीत सापडल्या आहेत. सरकारने या व्हिसा धोरणाविषयी अधिक उदार भूमिका घ्यावी आणि विदेशी विद्यार्थ्यांचे स्वागत करावे, अशी मागणी या संस्थांनी केली आहे.

## दोन लाख कोटी रुपयांचा व्यवहार

आपण या मागणीकडे एक साधी मागणी म्हणून पाहू तर आपली गल्लत होईल. त्यानिमित्ताने जे आकडे समोर आले आहेत, ते पाहिल्यावरच तिचे गुपित कळण्यास मदत होईल. ब्रिटनमध्ये एका वर्षांत जे विद्यार्थी येतात, त्यातून ब्रिटनमध्ये जो आर्थिक व्यवहार होतो, तो आहे तब्बल २८.८ अब्ज पौंडचा! म्हणजे सुमारे दोन लाख कोटी रुपयांचा. यात सर्वांत आघाडीवर आहेत ते भारतीय विद्यार्थी. उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमध्ये येणाऱ्या परकीय विद्यार्थ्यांचे ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेतील योगदान सांगणारा अहवाल प्रसिद्ध झाला असून त्यात ही माहिती देण्यात आली आहे. ब्रिटनमध्ये शिक्षण घेण्यासाठी सर्वाधिक विद्यार्थी चीनमधून येतात. (८६ हजार ८९५) भारतीय विद्यार्थ्यांची संख्या दुसऱ्या क्रमांकावर आहे. ती आहे १८ हजार ३०५. ती दुसऱ्या क्रमांकावर असली तरी या भारतीय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ब्रिटनला जो (टक्केवारीत) आर्थिक फायदा होतो, तो अधिक असल्याचे या अहवालात म्हटले आहे.


## ‘शिक्षण’ही हक्काची निर्यात?

ब्रिटनमध्ये प्रवेश करण्यासाठी लावण्यात आलेल्या नव्या कसोट्या, वाढीव शुल्क याचा वाईट परिणाम विद्यार्थी संख्या रोडावण्यावर होईल आणि ब्रिटनच्या ‘शिक्षण’या हक्काच्या निर्यातीला फटका बसेल, असा थेट इशाराच या अहवालात देण्यात आला आहे. याचा अर्थ ब्रिटनच्या निर्यातीमधून जो महसूल मिळतो, त्यात शिक्षणाचा वाटा मोठा असल्याचे त्यात मान्य करण्यात आले आहे. ब्रेक्झीटमुळे ब्रिटन हा युरोपीय युनियनचा भाग राहिलेला नाही. त्याचा ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झालाच आहे. युरोपमधून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही पुढील काळात कमी होण्याची शक्यता आहे. चीन आणि ब्रिटनचे आर्थिक संबंध अमेरिकेच्या चीनविरोधी धोरणांमुळे रोडावू शकतात. अशा परिस्थितीत चीन वगळता सर्वाधिक विद्यार्थी पाठविणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांचा मार्ग अधिक सुकर करा, असेच या अहवालात सुचविण्यात आले आहे. अर्थकारण देशाच्या धोरणावर किती खोलवर परिणाम करते, याचेच हे उदाहरण म्हणता येईल.

# सेबीच्या एका बदलामुळे शेअर बाजारात नवे वारे

**मागील आठवड्यात शेअर बाजारांची नियामक संस्था असणाऱ्या सेबीनं पर्यायी आधारावर शेअर व्यवहारांसाठी टी+१ रोलिंग सेटलमेंट सादर केली. परिपत्रकानुसार, हा नवीन नियम १ जानेवारी २०२२पासून अमलात येईल आणि तो सहा महिन्यांसाठी चाचणीच्या स्वरूपात असू शकतो.**

मागील आठवड्यात बाजारासाठी एक महत्त्वपूर्ण घटनेवर सुनावणी झाली आणि लगेचच ज्याच्यावर बाजारातील सक्रिय ब्रोकर्स, ट्रेडर्स, इन्व्हेस्टर्स, कस्टोडियन्स, बँका उलट सुलट चर्चा करू लागले आणि तितकंच त्यावरील तर्क-वितर्कांना उधाण येऊ लागलं. तर काय आहे ही महत्त्वपूर्ण बाब जी भारताला इतर जगाच्या तुलनेत पुढं नेऊन ठेऊ शकते?




प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

**टी+१ व्यवहारपूर्ती, म्हणजेच** T+1 Settlement.

सध्या आपल्या बाजारामध्ये टी+२ सेटलमेंट चालू असून त्याची सुरुवात बीएसईनं १ एप्रिल २००३पासून केली. त्या संदर्भात आधी आपण काही महत्त्वाच्या संज्ञांविषयी जाणून घेऊ. आधी मुंबई, राष्ट्रीय व इतर प्रादेशिक शेअर बाजारांचा व्यवहार हा एक आठवड्यासाठी असायचा हे लक्षात घेऊ, म्हणजेच सेटलमेंट मुदत ही एका आठवड्याची असायची. उदा. बाँबे स्टॉक एक्स्चेंजचे व्यवहार दर सोमवारी सुरू होऊन त्यांची सौदापूर्ती ही दर शुक्रवारी व्हायची, तर राष्ट्रीय म्हणजेच नॅशनल स्टॉक एक्स्चेंजचे व्यवहार हे बुधवार ते मंगळवार असायचे आणि पुणे स्टॉक एक्स्चेंजमध्ये व्यवहार शुक्रवारी चालू होऊन त्यांची सौदेपूर्ती दर गुरुवारी व्हायची. म्हणजेच आठवड्याच्या पहिल्या दिवशी घेतलेले शेअर्स त्यांची डिलिव्हरी न घेता ते विकण्यासाठी शेवटच्या दिवसापर्यंत मुभा असे व त्यानंतर त्या शेअर्सची डिलिव्हरी घेतल्यास संपूर्ण पैसे द्यावे लागत किंवा विकलेले असल्यास डिलिव्हरी द्यावी लागत असे. त्याचप्रमाणं आठवड्याभरात शेअर्सची नुसती खरेदी-विक्री करून व्यवहारपूर्ती केल्यास केवळ फरकाच्या रकमेचं पे-इन अथवा पे-आऊट जी जबाबदारी ही व्यवहार करणाऱ्याची (ट्रेडर्स, ब्रोकर्स, कस्टोडियन व पर्यायानं एक्स्चेंजची) असायची.

**पे-इन व पे-आऊट :** पे-इन म्हणजे खरेदी केलेल्या शेअर्सची डिलिव्हरी घेतल्यास किंवा सरलेल्या आठवड्यातील व्यवहारपूर्तीमध्ये (ट्रेडिंग) झालेला तोटा यांची रक्कम ब्रोकरला अदा करणं. तर पे-आऊट म्हणजे विकलेल्या शेअर्सची डिलिव्हरी दिल्याचे पैसे मिळणं अथवा आठवड्यातील व्यवहारांमधील झालेला नफा घेणं.

**रोलिंग सेटलमेंट :** आधी आठवड्याच्या व्यवहारांमध्ये टी+५ हे रोलिंग सेटलमेंट असायचे यामध्ये तेव्हा संपूर्ण पाच दिवसांचे १ रोलिंग सेटलमेंट गृहीत धरलं जायचं. याची सुरुवात १५ जानेवारी १९९८पासून डीमॅट शेअर्सच्या बाबतीत झाली, नंतर ३१ डिसेंबर २००१पासून सेबीनं सर्व स्क्रिप्समध्ये (कंपन्या) कंपलसरी रोलिंग सेटलमेंट आणलं आणि भारतानं या बाबतीत कात टाकली. हा बदल भारतासाठी मोठा मैलाचा दगड ठरला. तर आता प्रत्येक ट्रेडिंग दिवस हा ट्रेडिंग कालावधी मानला जातो आणि दिवसा झालेले व्यवहार दिवसभरातील निव्वळ दायित्वांवर आधारित ठरवले जातात. भारतात रोलिंग सेटलमेंटमधील व्यवहार टी+२ आधारावर सेटल केले जातात. सध्या टी+२नुसार शेअरचा व्यवहार (डिलिव्हरी/ट्रेडिंग) हा त्याचदिवशी सेटल करावा लागतो आणि त्याचं पे-इन व पे-आऊट त्या व्यवहार दिवसाच्या दोन दिवसांनंतर करण्याचं बंधन आहे. म्हणजेच सोमवारी झालेल्या व्यवहारांचं पे-इन हे बुधवारी सुमारे सकाळी ११पर्यंत तर पे-आऊट सुमारे दुपारी अडीच नंतर करण्यात येतं. म्हणजेच हा संपूर्ण व्यवहार रोज दुपारी अडीचपर्यंत पुरा करावाच लागतो. आता टी+१ सेटलमेंट चालू झाल्यास हाच व्यवहार वरील उदाहरणात मंगळवारीच पार पाडवा लागेल.




**शॉर्ट डिलिव्हरी :** आधी नमूद केल्याप्रमाणं, जर तुम्ही ट्रेडिंग म्हणजे ’T’ दिवशी कोणताही स्टॉक विकला तर तुम्हाला T+२ वर शेअर्सची डिलिव्हरी देण्याचं बंधन आहे, परंतु तसं न झाल्यास त्या अयशस्वी पे-इन डिलिव्हरीस शॉर्ट डिलिव्हरी संबोधलं जातं. अगदी कोणी या गोष्टी जाणूनबुजून करत नसतील तरी क्वचितशा तांत्रिक त्रुटींमुळं असं घडू शकतं.


**ऑक्शन (शेअर्सचा लिलाव) :** शेअर बाजारातील व्यवहारांबाबत ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. ही एक नामुष्कीची बाब आहे जी विकलेल्या शेअर्सची डिलिव्हरी ही पे-इन दिवसाच्या आंत ब्रोकर/एक्सचेंजला न देऊ केल्यास ओढवते. डिलिव्हरी दिली न गेल्यास त्यास बॅड डिलिव्हरी मानलं जाऊन सौदापूर्ती म्हणजे ज्या कोणी ते शेअर्स घेतलेले असतील त्यास डिलिव्हरी देण्यासाठी अथवा त्याचा मोबदला देण्यासाठी एक्स्चेंज हे बांधील असतं आणि म्हणूनच रोज विशेष असं ऑक्शन मार्केट टी+३ दिवशी थोड्या वेळासाठी चालू होत असतं ज्यामध्ये केवळ एक्स्चेंजचे मेंबर्सच भाग घेऊ शकतात आणि त्यासाठी एक्स्चेंज त्या ऑक्शन होणाऱ्या कंपन्यांच्या शेअर्ससाठी एक ठराविक किंमतपट्टा ठरवून देते ज्यामध्ये ऑक्शन मार्केटमध्ये भाग घेणारे मेंबर्स आपले शेअर्स देऊ (विकू) शकतात. या किंमतपट्ट्यासाठी टी+२ दिवसाच्या बंद भावापेक्षा जास्तीत जास्त २० टक्के भाव गृहीत धरला जाऊ शकतो आणि ऑक्शन मार्केटमधील झालेल्या व्यवहारानुसार ऑक्शन प्राईस ठरवली जाते आणि त्या निघालेल्या (derived) भावाप्रमाणं त्यामध्ये वरती ०.०५ टक्के दंड आकारला जाऊन शॉर्ट डिलिव्हरी देणाऱ्यास हा बोजा उचलावा लागतो. कधीकधी ऑक्शन मार्केटमध्ये शेअर्सची लेन-देन होऊ न शकल्यास डिलिव्हरी घेणाऱ्यास त्या जास्तीच्या किंमतीनं परतावा दिला जाऊ शकतो यालाच कॅश सेटल्ड म्हटलं जातं. सध्याच्या परिस्थितीत गुंतवणूकदारांचे शेअर्स पॉवर ऑफ ॲटर्नी (POA) अथवा ब्रोकर्सकडं प्लेज केलेले असल्यानं डिलिव्हरी डिफॉल्ट्सची शक्यता कमी झालेली आहे जी एक चांगली बाब आहे.

आताच्या नवीन नियमानुसार, स्टॉक एक्सचेंजेस किमान एका महिन्याची आगाऊ सूचना दिल्यानंतर कोणत्याही स्क्रिप्सवर (नोंदणीकृत कंपन्या) टी+१ सेटलमेंट देऊ शकतात. टी+१ सेटलमेंटचा नवीन नियम ही नियामकाच्या बाजूनं एक चांगली चाल आहे, कारण यामुळं ग्राहकांना त्यांच्या मार्जिनची गरज कमी होण्यास मदत होऊ शकते, कारण त्यांचे मार्जिन दोन दिवसांऐवजी एक दिवसासाठीच ब्लॉक केले जाऊ शकते. याव्यतिरिक्त, एका दिवसात गुंतवणूक परत मिळण्यासाठी वेळेत केलेली कपात म्हणजे अधिक किरकोळ गुंतवणूक इक्विटी मार्केटमध्ये येईल ही शक्यता. तरीही काहींना ही गोष्ट धाडसाची वाटते कारण ह्याची सुरळीत पूर्तता होण्यासाठी अनेक तांत्रिकी सोपस्कार पार पाडावे लागतील त्याचप्रमाणं एक्सचेंजेसला काही कार्यरत समस्यांचा सामना करावा लागू शकतो, कारण संपूर्ण सेटलमेंट सायकल पूर्ण करण्यात अनेक घटक आणि संस्था समाविष्ट आहेत आणि सर्वांनी एकत्रपणे आपापली जबाबदारी स्वीकारणं गरजेचं आहे. याउलट टी+१ सेटलमेंटमध्ये भारताला निधीपूर्व बाजारपेठ मिळेल, परंतु त्यासाठी जागतिक संस्थात्मक गुंतवणूकदारांना या संरचनेसह अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकतं, कारण टी+२मध्ये पैसे भरण्यासाठी आधी एक दिवसाचा अवधी मिळत आहे, परंतु टी+१मध्ये तुमच्या ब्रोकरकडील खात्यात व्यवहाराएवढी आगाऊ रक्कम असणं आवश्यक असेल आणि कदाचित पुढील काळाची (टी+१) गरज म्हणून सध्याचे १०० टक्के मार्जिन्सचे नियम या १ सप्टेंबरपासून लागू करण्यात आलेले आहेत.

### सुपरशेअर : ग्रासिम इंडस्ट्रीज

केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी, १०६८३ कोटी रुपये उत्पादन लिंक्ड इन्सेन्टिव्ह किंवा पीएलआय योजना मंजूर केली, त्यामुळं बाजारातील तज्ज्ञ या घोषणेनंतर कापड क्षेत्रावर बुलिश आहेत. ग्रासिम या कंपनीच्या शेअर्सना या बातमीमुळं मागणी राहिली आणि त्यामुळं ग्रासिम कंपनीच्या शेअर्सचा भाव गेल्या आठवड्यात निफ्टी ५० कंपन्यांमधील सर्वांत जास्त म्हणजे सुमारे साडेसहा टक्क्यांनी वाढला. १९४७ साली टेक्स्टाईल उत्पादक सुरू झालेली ग्रासिम इंडस्ट्रीज ही आज देशातील अग्रगण्य नावाजलेली कंपनी आहे. आज अनेक क्षेत्रांमध्ये नेतृत्व उपस्थितीसह एक अग्रणी वैविध्यपूर्ण अशी कंपनी म्हणून विकसित झाली आहे. कंपनी ही व्हिस्कोस स्टेपल फायबर, भारतातील सर्वांत मोठे क्लोर-अल्कली, लिनन आणि इन्सुलेटर्स प्लेयरचे अग्रगण्य जागतिक उत्पादक आहे. अल्ट्राटेक सिमेंट आणि आदित्य बिर्ला कॅपिटल या त्याच्या सहाय्यक कंपन्यांद्वारे, कंपनी भारतातील सर्वांत मोठी सिमेंट उत्पादक आणि एक अग्रणी वैविध्यपूर्ण वित्तीय सेवा पुरवणारी कंपनी आहे. ग्रासिमनं सजावटीच्या पेंट्स व्यवसायात उडी घेण्याची घोषणा केली आहे. त्याचबरोबर ग्रासिम आगामी वर्षात २६०० कोटी रुपयांची भांडवली खर्चासाठी गुंतवणूक करणार असल्याची घोषणा केली आहे. त्यामुळं भविष्यातदेखील कंपनीच्या शेअर्सना मागणी राहू शकते.

## या आठवड्याचे ट्रेड



अभिजित पाटील
abhijit.r.patil1995@gmail.com

### कंटेनर कॉर्पोरेशन (Container Corporation of India)

कंटेनर कॉर्पोरेशन या स्टॉकने हॉरीझॉन्टल चैनल पैटर्न ब्रेकआउट दिला आहे. हा स्टॉक सध्याच्या बाजार किंमतीला ७४३ अथवा खाली ७३५पर्यंत खरेदी करू शकता. या स्टॉकचे टार्गेट असेल ७८०/८१० रुपये आणि स्टॉपलॉस असेल ७०८ रुपये.



### पीएफसी (Power Finance Corporation)

पीएफसी या स्टॉकने ट्रिपल बॉटम तसेच ट्रँगल ब्रेकआऊट दिला आहे. हा स्टॉक सध्याच्या बाजार किंमतीला १३५ अथवा खाली १३४पर्यंत खरेदी करू शकता. या स्टॉकचे टार्गेट असेल १३८/१४०/१४२ रुपये आणि स्टॉपलॉस असेल १३२ रुपये.



**(सावधानतेचा इशारा - शेअर बाजारातील ट्रेडिंगमध्ये जोखीम ही असतेच. त्यामुळे ज्यांना ट्रेडिंगचा अनुभव आहे त्यांनीच ही जोखीम घेणे तसेच स्टॉपलॉस लावल्याशिवाय ट्रेडिंग न करणे अपेक्षित आहे.)**

# वाहतूक कोंडीने नेरळवासी त्रस्त

## भर गणेशोत्सवात बाजारात वाहनांच्या रांगा

**कर्जत : बातमीदार**

नेरळ गावात गणेशोत्सव काळात होणारी वाहतूक कोंडी दरवर्षीप्रमाणे होते, मात्र पाडा गेट आणि माथेरान-नेरळ रस्त्यावर नेरळ गावात होणारी दररोजच्या वाहतूक कोंडीला सर्व कंटाळले आहेत. पोलीस प्रशासन अवजड वाहनांना सणाच्या काळात प्रतिबंध घालण्यात यशस्वी झाले नाहीत. त्यामुळे वाहतूक कोंडीला सर्वांना सामोरे जावे लागत आहे.

नेरळ शहरात सध्या वाहतूक कोंडीचा फटका बसत असून ही मोठी समस्या निर्माण होऊन बसली आहे. वाहने रस्त्यात पार्क करण्याच्या पद्धतीने शहरात ठिकठिकाणी वाहतूक कोंडी होताना दिसत आहे. नेरळ शहरातील मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावर खाजगी वाहनचालक आपली वाहने रस्त्यावरच उभी करून बाजारात जात आहेत. त्यामुळे शहरात रस्त्यांवर वाहनांची कोंडी होत आहे. त्यात नेहमीच गजबजलेला असलेला नेरळ अंबिका नाका ते हेटकर आळी या रस्तावर वाहने रस्त्याच्या कडेला उभी केली जात आहेत.वाहनचालक यांच्या या नवीन प्रथेमुळे गेली काही महिने वाहतूक कोंडी होत असून अन्य वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.



शिवाय नेरळ मारुती मंदिर या परिसरातील रस्त्यावर देखील वाहने लावली जात असून वाहतूक कोंडी होत आहे.त्यात याच भागात बँका असून त्यांच्यामुळे या परिसरात बँकेत येणारे खातेदार देखील रस्त्यावर वाहन पार्क करून तासन्‌तास वाहने तेथेच उभी ठेवलेली पाहायला मिळतात. शिवाय येथे लहान मुलांचे खाजगी रुग्णालय देखील असल्याने येथे मोठ्या प्रमाणात वाहने रस्त्यात उभी केली जात आहे. या पार्क केलेल्या वाहनावर येथील स्थानिक प्रशासनाचा अंकुश नसल्याने येथील खाजगी वाहनचालकांचे फावले असून यामुळे शहरात वाहतूक कोंडीची समस्या बिकट झाली आहे.

नेरळ शहराच्या मुख्य बाजारपेठेतूनच माथेरान-नेरळ-कळंब हा राज्य मार्ग जात आहे, त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात वाहनांची रेलचेल सुरू असते. त्यामुळे या वाहनांना रस्त्यात पार्क केलेल्या वाहनांचा अडसर होत असून परिणामी येथे वाहतूक कोंडी होताना दिसत आहे.गणेशोत्सव सुरू होत असल्याने आणखी वाहतूक कोंडी होऊन या वाहतुकीचा त्रास आता स्थानिकांना सहन करावा लागत असून रेल्वे फाटकदेखील वाहतूक कोंडीची समस्या बनले आहे. फाटक बंद झाल्यानंतर अंबिका नाक्यापर्यंत तर पलीकडे मातोश्रीनगरपर्यंत वाहनांची रांग लागते. हे सर्व दररोज घडत असून ही वाहतूक कोंडी नेरळकरांसाठी समस्या बनली आहे.

# मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक पोलिसांना सहकार्य करा

## भाजपचे संजयआप्पा ढवळे यांचे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

गणेशोत्सव काळात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक व्यवस्था सुरळीत सुरू ठेवण्यासाठी वाहनचालकांनी पोलिसांना सहकार्य करा, असे आवाहन भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा ओबीसी सेलचे अध्यक्ष तथा माणगाव तालुकाध्यक्ष संजयआप्पा ढवळे यांनी केले आहे. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात संजयआप्पा ढवळे यांनी पुढे असे म्हटले आहे की, शुक्रवारी (दि.१०) गणरायाचे आगमन होत आहे. गणेशोत्सव हा सण कोकणात मोठ्या उत्साहात दरवर्षी साजरा केला जातो.



या सणासाठी मुंबई व पश्चिम महाराष्ट्रातून चाकरमानी आपल्या गावी कोकणात मोठ्या संख्येने गणेशोत्सव साजरा करण्यासाठी येत असतात. त्यामुळे या काळात मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांच्या रांगाच रांगा लागलेल्या असतात. महामार्गावरील वाहतूक व्यवस्था सुरळीतपणे सुरू ठेवण्यासाठी रायगड पोलीस दलाला महिनाभर अगोदरपासून व्यवस्थितपणे नियोजन करावे लागते. विविध संस्था संघटनांच्या प्रतिनिधींची, सदस्यांची या कामी मदत घेऊन वाहतूक पोलीस महामार्गावरील वाहतूक व्यवस्था कोलमडणार नाही याची काळजी घेत असतात. यासाठी वाहनचालकांनी पोलिसांना सहकार्य करणे आवश्यक आहे, तसेच कोविड संकटाची सर्वांनी काळजी घेऊन तोंडाला मास्क लावणे, सुरक्षित अंतर ठेवणे, गर्दी न करणे या त्रिसूत्रीचे तंतोतंत पालन करून गणेशोत्सवाचा आनंद घ्यावा, असे ढवळे यांनी सांगितले.

# माथेरानमध्ये ९५ टक्के लसीकरण पूर्ण

**कर्जत : बातमीदार**

कोविड १९ला हद्दपार करण्यासाठी येथील नगरपालिका प्रशासनाने भर दिला आहे. माथेरान आणि आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आवाहन करून लसीकरणाची प्रगती सुसाट सुरू आहे. आजच्या घडीला माथेरानमध्ये ९५ टक्के लसीकरण पूर्ण झाले आहे.




माथेरान हे पर्यटनस्थळ असून हे पर्यटनस्थळ कोविडमुक्त असावे यासाठी स्थानिक प्रशासनाने कंबर कसली आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी पर्यटनस्थळ असल्याने येथील लसीकरणासाठी विशेष लक्ष दिले होते. माथेरानमधील १८ वयोगटावरील लोकसंख्या ३४९७ असून आतापर्यंत ३५६० लोकांनी पहिला डोस घेतला आहे. यामध्ये ९५ टक्के लोकांचे पहिले लसीकरण झाले असून आजूबाजूच्या आदिवासी वाड्यातील लोकांनी या लसीकरणात सहभाग नोंदवला आहे. हशाची पट्टी, गारबट, असल, निगडीची पट्टी या वाड्यांतील लोकांनी लसीकरण केले. आतापर्यंत ३२०० स्थानिकांनी लसीकरण केले आहे, तर दुसरे लसीकरण १३५९ लोकांनी पूर्ण केले आहे. यामध्ये सर्व माथेरानकरांचा सहभाग आहे असे येथील प्रशासनाच्या सूत्रांनी सांगितले.

# सुधागडात अवैध गावठी दारूची विक्री

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुका हा आदिवासी बहुल तालुका आहे. येथील दुर्गम, डोंगराळ, जंगलभागासह दऱ्याखोऱ्यात मोठ्या प्रमाणावर गावठी दारूची अवैध निर्मिती व विक्री केली जात असल्याचे समोर आले आहे. येथील डोंगराळ व वनाच्छादीत प्रदेशाने वेढलेल्या परळी, जांभुळपाडा विभाग, तसेच तालुक्याच्या इतर आदिवासी वाडीतील परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध गावठी दारूचा व्यवसाय चालतो.

पोलीस स्थानकापासून काहीशा अंतरावर गावठी दारू विक्रीचा अवैद्य धंदा सुरू असल्याचे दिसते. पोलिसांकडून मात्र कारवाई केली जात नाही. हीच परिस्थिती तालुक्यातील पेंढरमाळ, वावे (माणगाव बुद्रुक) दर्या गाव ठाकूरवाडी, हातोंड विभागातील कसईशेत व अन्य ठिकाणी देखील दिसून येते.

अवैध धंद्यांबाबत स्थानिक सरपंच अथवा पोलीस पाटील यांनी बेधडक पावले उचलावित अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. यासंदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षकांना देखील तक्रारी निवेदन देणार असल्याचे येथील तरुणांनी सांगितले. आदिवासी बांधवांना देशोधडीला लावणाऱ्या गावठी दारूचा कायमचा बंदोबस्त व्हावा, अशी मागणी महिला व युवक, युवतींकडून होत आहे.

# सुधागडात महावितरणची धडक कारवाई

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात वीज चोरीच्या प्रकारात वाढ झाली असली तरी आता वीजवितरण विभागाची चोरट्या ग्राहकांवर करडी नजर आहे. वीजचोरांविरोधात सुधागड वीज महावितरण विभागाने कंबर कसली आहे. जानेवारी ते ऑगस्ट महिन्यात केलेल्या ५० कारवायांत तब्बल १३ लाख ६४ हजार ४५ रुपयांचा दंड वसूल केला आहे, तर ऑगस्टमध्ये तब्बल २० जणांवर कारवाई करून चार लाख ८४ हजार ३०० रुपये एवढा दंड वसूल केला आहे.

लाखो रुपयांचा दंड वसूल

सुधागड-पाली वीज महावितरणने जानेवारी महिन्यात सहा कारवाया केल्या. या वेळी १३१५८ युनिटची चोरी पकडली. यामध्ये १,५६,६२० रुपयांचा दंड वसूल केला. फेब्रुवारीमध्ये आठ कारवायांत १,८२,००५ रुपये दंड वसूल केला. मार्चमध्ये १५ कारवायांत ४,९२,१४० रुपयांचा दंड वसूल केला. जुलै महिन्यात ४८,९८० रुपये दंड वसूल केला, तर ऑगस्ट महिन्यात २० कारवायांत ४,८४,३०० रुपयांचा दंड वसूल केला.

**सुधागड तालुक्यात वीज चोरी होत असल्याची बाब प्रकर्षाने जाणवली. वीजवितरणने या प्रकाराला आळा घालण्यासाठी व्यूहरचना आखली आहे. वीजचोरी करणारांवर महावितरण ठोस व धडक कारवाई करून दंड वसूल करत आहे. ही कारवाई कायम सुरू राहणार आहे. कोणीही नियमबाह्य व अवैध काम करू नये, तसेच वीजचोरी करू नये.**

**-जतीन पाटील,**
**उपकार्यकारी अभियंता,**
**पाली-सुधागड**

# प्रभागनिहाय शिबिरांमुळे लसीकरणाचा वेग वाढला

**कर्जत : प्रतिनिधी**

लसीकरणाचे महत्त्व समजल्यावर विशेषतः कर्जत उपजिल्हा रुग्णालयातील लसीकरण केंद्रावर मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. त्यामुळे आता नगरसेवक व सामाजिक कार्यकर्त्यांनी लक्ष घालून प्रभागांमध्ये लसीकरण शिबिरांचे आयोजन होत असल्याने शहरातील लसीकरणाचा वेग वाढला आहे.



लसीकरण करणाऱ्या सुमारे १५ कंत्राटी आरोग्य सेवकांना तांत्रिक मुद्दा पुढे करून १ सप्टेंबरपासून अचानक कामावरून कमी केल्याने उपजिल्हा रुग्णालयात कायम असलेल्या कर्मचाऱ्यांवर लसीकरण करून देण्याची वेळ आली. त्यामुळे अधिकच गोंधळ उडाला होता. यावर उपाय म्हणून काही नगरसेवकांनी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. मनोज बनसोडे यांच्याशी संपर्क साधून प्रभागांमध्ये लसीकरण शिबिरासाठी सहकार्य करण्याची विनंती केली. त्यांनी लगेचच डॉक्टर आणि कर्मचारी उपलब्ध करून देण्याची तयारी दाखवली. प्रभाग ५ मधील नानामास्तर नगरमध्ये माजी नगरसेवक संतोष पाटील यांच्या संपर्क कार्यालयात लसीकरण शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी नगरसेविका संचिता पाटील, मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी भेट दिली. या केंद्रावर १४६ पुरुष ११८ महिला एकूण २६४ नागरिकांनी लसीकरण करून घेतले. यामध्य केवळ सहा जणांनी दुसरा डोस घेतला. लसीकरणासाठी उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉ. संगीता दळवी, डॉ. गुलाम नविवाला, पूनम जगदाळे, तर सामाजिक कार्यकर्ते प्रसन्न गुरव, ज्ञानेश्वर कर्णुक, संदीप पाटील यांनी सहकार्य केले. भाजप किसान मोर्चाचे कोंकण संघटक सुनील गोगटे यांनीही विठ्ठल नगरमध्ये लसीकरण शिबिराचे आयोजन केले होते. त्या शिबिरातही अनेक नागरिकांनी लसीकरण करून घेतले. एकंदरीत या लसीकरण शिबिरांमुळे कर्जत शहरातील लसीकरणाचा वेग वाढला आहे.



**मोहोपाडा : अखिल गुरव समाज संघटनेच्या आरती संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी संघटनेचे प्रदेश युवक अध्यक्ष विजय ठोसर, रायगड जिल्हा अध्यक्ष अमोल गुरव, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र खंडागळे, जिल्हा युवक उपाध्यक्ष सचिन गुरव, खोपोली शहर अध्यक्ष निलेश गुरव, जिल्हा महिला उपाध्यक्ष अदिती पवार आदी उपस्थित होते.**

# कोरोना निर्बंध असूनही उत्साहाला उधाण

## म्हसळ्यात ३१०५ श्रींची प्राणप्रतिष्ठा

**म्हसळा : प्रतिनिधी**

गणेशभक्त दरवर्षी गणेशोत्सवाची आतुरतेने वाट पाहात असतात. त्यानुसार तालुक्यातील ८० गावांतून ३१०५ श्रींची प्राणप्रतिष्ठा झाली आहे. अनेक शहरांतून व गावांतून गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी श्रींचे आगमन होत आसल्याने शुक्रवारी (दि. १०) गणरायाच्या स्थापनेचा शुभमुहूर्त भाविकांनी साधला.

शुक्रवारपासून सुरू झालेला गणेशोत्सव कोकणात १० दिवस उत्साहात साजरा केला जातो. भाविक आपल्या श्रद्धेप्रमाणे दीड, पाच, सात आणि १० दिवस गणरायाची सेवा करतो. गणपती आगमनानंतर दिवस आनंदात आणि भक्तीमय वातावरणात निघून जातात. बाप्पाला ठरलेल्या वेळी निरोप दिला जातो आणि पुढच्या वर्षी पुन्हा त्याच्या आगमनाची प्रतीक्षा केली जाते. तालुक्यात या वर्षी दीड दिवसाचे गणपती ९०५, पाच दिवस व गौरीविर्सजनासोबत जाणारे १४६०, तर अनंत चतुर्दशीला विसर्जन होणारे ७४० असे उत्सवाचे स्वरूप आहे.

# सालेगावचा एक गाव एक गणपती

## १०० वर्षांची परंपरा

**माणगाव : सलीम शेख**

माणगाव तालुक्याच्या साले गावातील ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने एक गाव एक गणपती ही संकल्पना राबविली आहे. ही परंपरा गेल्या १०० वर्षांपासून सुरू आहे. ग्रामस्थांनी आपल्या या कृतीतून एक वेगळे अनुकरणीय पाऊल टाकत सर्वांपुढे आदर्शच उभा केला आहे. गणेशभक्तांच्या नवसाला पावणारा म्हणून या गणपतीची ओळख आहे. म्हणूनच दरवर्षी या गणपतीच्या दर्शनाला महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील माणगावपासून अवघ्या चार किमी अंतरावर असलेले अत्यंत छोटे व निसर्गरम्य असे हे साले गाव आहे.



साले गावाच्या पश्चिमेला शिवगणेश मंदिर आहे. दरवर्षी गणेश चतुर्थीला भक्तगण या मंदिरात येतात. त्यानंतर गेल्या वर्षी गावाने बोललेला सामूहिक व वैयक्तिक असे नवस फेडले जातात. त्यानंतर पुन्हा नव्याने भक्त आपापले वैयक्तिक नवस बोलतात अशी प्रथा आहे. दुपारी एकनंतर सजविलेल्या पालखीतून पूर्वापार प्राचीन असणारी ही गणेशाची मूर्ती मंदिरालगत असलेल्या शिवकालीन तलावातून छातीभर पाण्यातून शंखनाद व मोरयाच्या गजरात फिरविली जाते. तलावातून पालखी फिरवण्याची ही प्रथा गेल्या कित्येक वर्षापासूनची आहे. हा पालखीसोहळा सुद्धा अनेकांसाठी आकर्षणाचा भाग असतो. नंतर ही पालखी गावातूनही फिरविण्यात येते. पालखी मंदिरात गेल्यानंतर आरती होऊन मूर्तीची पुन्हा स्थापना केली जाते. गावातील कोणत्याही घरात वैयक्तिकरीत्या अथवा दुसऱ्या सार्वजनिक गणपतीची स्थापना कोणीही करीत नाही, असे केल्यास त्याच्या घरात अरिष्ट येते अशी तेथील ग्रामस्थांत समजूत आहे.

# साहिल जैन यांचा आठ दिवस उपवास

## पर्युषण पर्वातील अठ्ठाई यशस्वीपणे पूर्ण

**कर्जत : बातमीदार**

नेरळमधील साहिल ललित जैन या १६ वर्षीय तरुणाने पर्युषण पर्वानिमित्त आठ दिवस कडक उपवास केले.औषध निर्माण शास्त्राचा विद्यार्थी असलेल्या साहिलने आठ दिवस केवळ गरम पाणी प्राशन करून हे उपवास केले.दरम्यान, आज पर्युषण पर्व समाप्त होत असताना जैन कुटुंबाने साहिलच्या उपवास सोडण्याच्या कार्यक्रमाचा कौटुंबिक सोहळा साजरा केला.

गिरनार पर्वतावरील नेमिनाथदादा यांचे निस्सिम भक्त असलेले नेरळमधील जैन कुटुंबीय यांच्याकडून पर्युषण पर्व समाप्ती सोहळ्याचे आयोजन केले होते. स्व. सागरमल सरदारमल जैन आणि शारदाबाई सागरमल जैन यांचे नातू साहिल ललित जैन या १६ वर्षीय तरुणाने ३ सप्टेंबर रोजी जैन धर्मियांच्या पर्युषण पर्वानिमित्त कडक उपवास करण्याचे व्रत हाती घेतले होते. कर्जत येथील कोकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालयातील औषध निर्माण महाविद्यालयात दुसऱ्या वर्षात शिकत असलेल्या साहिलने पर्युषण पर्वातील अठ्ठाई काळात केवळ गरम पाणी प्राशन केले. आज ११ सप्टेंबर रोजी पर्युषण पर्व दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी संपले. या वेळी नेरळमधील मुनिसुव्रत स्वामीय मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे-नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत, सदर मिळकतीचे मालक श्री. श्रीपाद भास्कर कुलकर्णी यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४०० | ४ | १.७१.०० | १७.१० |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १२/०९/२०२१

सही/-
ॲड. ऋषीकेश अनिल कांबळे
बी.ए.एल.एल.बी.
नेरळ, कुंभार आळी, जिल्हा परिषद शाळेसमोर, ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं. : ९५६१७३४३७७

# गणेश दर्शन





गव्हाण (ता. पनवेल) : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी गणरायाचे मोठ्या जल्लोषात आणि भक्तिभावात आगमन झाले. फुलापानांच्या मखरात विराजमान झालेल्या श्रीगणेशाच्या लोभस मूर्तीचे सर्वांनी मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी कुटुंबीयांसह बाप्पाचे दर्शन घेतले. (छाया : लक्ष्मण ठाकूर)



भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या शेलघर (ता.पनवेल) येथील निवासस्थानी विराजमान गणराय.



शैलेश पाटील, सचिन पाटील व संतोष म्हात्रे यांच्या नावडे, ता. पनवेल येथील निवासस्थानी विराजमान गणपती.



माजी नगरसेवक जगदीश गायकर, विजय गायकर यांच्या घरच्या गणेशाचे दर्शन महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी घेतले.



पनवेल महापालिकेचे नगरसेवक तेजस कांडपिळे यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या गणरायाचे तालुका भाजपचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दर्शन घेतले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.



भाजप रायगड जिल्हा ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष एकनाथ देशेकर यांनी त्यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या बाप्पाची मनोभावे पूजा केली. या वेळी चिंध्रण ग्रामपंचायतीच्या सरपंच कमला देशेकर, उपसरपंच मंगेश पाटील, माजी सरपंच नामदेव जमदाडे, माजी उपसरपंच दिनेश पाडेकर, रवींद्र पाटील, उमेश वारदे, विश्वनाथ पाटील, मंदा देशेकर, कुंडलिक देशेकर उपस्थित होते.



भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी यांच्या तळोजा पेठाली येथील निवासस्थानी स्थानापन्न बाप्पा



कामगार नेते श्री. जितेंद्र घरत, चिर्ले, ता. उरण



हरिभाऊ देशमुख, पनवेल



परिक्षित ठाकूर, नागाव, ता. उरण



राजेश वेदक, पनवेल



पार्थ अमोल सकपाळ, चौक.



मंगेश पिळवीळकर, पनवेल



बबन खिळदकर, नवीन पनवेल

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com